✲ प्रकरण पाचवे ✲

# समकालीन मराठी कथा आणि विलास सारंग यांच्या कथेचे वेगळेपण

## ✳ प्रकरण - पाचवे ✳

# समकालीन मराठी कथा आणि विलास सारंग यांच्या कथेचे वेगळेपण

### प्रास्ताविक

नवकथेनंतर दुसऱ्या पिढीतले कथाकार म्हणून विलास सारंग यांचे स्थान समीक्षकांनी निश्चित केले आहे. नवकथेनंतरची कथा पहिल्यास कथेची अभिव्यक्ती, तंत्र आणि आशयाला बराच बदल झालेला आहे.

यांत्रिकतचे आक्रमण, विज्ञानवादी दृष्टी, आधुनिकतावाद, विश्वसाहित्याची संकल्पना या गोष्टीमुळे समाकलीन कथेत बरेच बदल घडले. पाश्चात्य आधुनिकतावादी विचारांचा परिणाम, सार्त्र, काम्यू, किर्कगार्ड यांनी नव्याने मानलेला अस्तित्ववाद, महानगरातील यांत्रिकतेचे आक्रमण परमेश्वरी श्रद्धेच्या कल्पना आणि ग्रामीण परिसरातही महानगरीय संस्कृतीचे आक्रमण यामुळे अस्वस्थ झालेल्या समाजाचे चित्रण या पिढीतल्या कथा कारांनी केले. मानवाचे मुलभूत, एकाकीपण, त्याने जोडलेल्या संबधावरचे संशयाचे मत्सराचे सावट, सामाजिक संस्थाची निरर्थकता या गोष्टींचे चित्रण कथा साहित्यातून झाले आहे.स्त्री आणि दलितांची सामाजिक विषमता शहरी आणि ग्रामीण भागातील राजकारण,बुद्धिजिवी आणि मध्यमवर्गीयांची अगतिकता हेही विषय प्रामुख्याने या कथेत आले. या आजच्या कथेविषयी म.द. हातकणंगलेकर म्हणतात ? “आजची मराठी कथा विविध, विपूल, गुणसंपन्न व प्रयोगाभिमुख बनली आहे. आजच्या उदंड नाटकापेक्षा तिची आशयघनता निश्चितच अधिक आहे. आजची मराठी कथा गुणवत्तेच्या अनेक पातळयावर फुलते आहे.”[१]

१९४५ ते ६० दरम्यान मराठी कथेचा कायाकल्प झाला. केवळ मराठी कथेचा विकास पुढे चालू न राहता त्यामध्ये उत्क्रांती झाली. या काळातल्या काही मातब्बर कथाकारांना कथा या वाङमयप्रकाराला कलात्मक सामर्थ्य आणि आत्मा प्राप्त करून दिला. नवीन विषय गांभीर्याने हाताळून मराठी कथा प्रयोगाकडे वळविली. ६० नंतरच्या काळात ती अधिकच प्रयोगक्षम, समृद्ध, कलासंपन्न आणि जीवनाच्या अज्ञाताच्या वाटा

धुंडाळू लागली. यातूनच चित्रे,खानोलकर, पुंडलिक, चिमुरले, पानवलकर, कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, ए.वि.जोशी,बाबूराव बागूल, आनंद जोतगावकर या कथाकरांनी पाश्चात्य साहित्यातील नव्या वाटा मराठी कथेला मिळवून दिल्या. याचाच परिणाम पुढच्या पिढीवर झाला. जी.ए. सारखा सामर्थ्यवान कथाकार याच काळात आपली कथा लिहू लागला. पाश्चात्य विचार प्रवाहांचा परिणाम आणि ९० शतकातील अखरेची अस्वस्थता या बदलणाऱ्या कथांना कारणीभूत झाली. मराठी कथेने प्रादेशिक परंपरा सोडली, सौंदर्यवादी दृष्टी आणि कुटुंबकथा ग्रामीण दलितांना दु:खे आणि व्यक्तिचित्रणातील मनोनिष्ठता यांच्या पलिकडे अनेक वाटा ही कथा धुंडाळू लागली. प्रयोग आणि विसाव्या शतकातले अखेरीचे तत्वज्ञान अस्तित्ववाद याकडे ती अधिकाधिक झुकू लागली. यामध्ये नव्याने काही कथाकार नवकथेच्या दुसऱ्या पिढीत उदयास आले. या विषयी म.द. हातकणंगलेकर म्हणतात, “आजच्या पिढीतल्या कथाकारांत कथारूपाच्या नव्या शक्यता आजमावण्याची उमेद व सामर्थ्य वाढते आहे असे दिसते. क.दि. सोनटक्के, श्याम मनोहर, अनिल डांगे, प्रभाकर मयेकर, रत्नाकर पटवर्धन, गौरी देशपांडे, एस.डी. इनामदार व चारूदत्त भागवत यांच्या कथांचे रूप विश्लेषण करणे उद्‌बोधक ठरणार आहे. ह.म. मराठे, सखा कलाल, चारूता सागर, बाळकृष्ण प्रभुदेसाई, सानिया इ. कथाकरांचीही नावे आठवतात.”[२]

नवकथेचे सर्व विशेष पचवून दुसऱ्या पिढीतल्या नवकथाकारांनी आपली कथा मांडली. पाश्चात्य देशातील ‘आस्तित्ववादी’ प्रवाहाची आशयसूत्रे या कथेने स्वीकारली यामध्ये प्रामुख्याने दिलिप चित्रे, कलम देसाई, विलास सारंग यांची नावे घेता येतील. नवकथेच्या वळणाने जाणारी कथा आणि अस्तित्ववादी कथेच्या सीमारेषा अगदी पुसट असल्याने दुसऱ्या पिढीतल्या नवकथेतील आशयघटकांची मांडणी अनेक वेळा अस्तित्ववादाशी जवळची वाटते. नव्या पिढीतला जीवन व्यवहार आणि त्या अनुषंगाने साहित्य व्यवहार हा या नवकथेचा विशेष आहे. नवकथा पूर्व घटनाप्रधान, पात्रप्रधान कथा आणि नवकथेतील घटनापात्र विरहीत कथा या दोंघाचा समन्वय पचवून ही नव्या पिढीतील कथा आली. या विषयी अंजली सोमण म्हणतात, “अनुभवांची विविधता, जाणीव-नेणिवेतील गुंतागुंत, प्रभावी व्यक्तिरेखा व सूक्ष्म मनोविश्लेषण, प्रत्ययकारी वातावरण

निर्मिती, तंत्राच्या साचेबंदतेला विरोध, प्रचारकी बोधवादाला व रंजनवादाला नकार, प्रतिमांचा सुयोग्य वापर अनलंकृत, गंभीर आणि विषयाला चिरत जावून वाचकाच्या मनात रूतणारी भाषा हे नवकथेचे विशेष ६० नंतरच्या मुख्य प्रवाहातील कथेने घेतले."[३]

"नवकथेप्रमाणे घटनाविरहीत कथा लिहिणे हे एक टोक तर हरिभाऊ कालखंडाप्रमाणे घटनांची आणि पात्रप्रसंगाची कथेत गर्दी करणे हे दुसरे टोक. ही दोन्ही टोके टाळून ६० नंतरच्या कथेने दोन्ही टोकांच्या मधून जाणारी व दोन्हीतील योग्यते घेवून विकसित होत जाणारी वाट चोखाळली."

कथेच्या विकासाची आणि प्रगल्भतेची बीजे या नव्या पिढीतील कथाकरांनी निर्माण केली आहेत. त्यातही व्यक्तिपरत्वे आपल्या कथेचे अनन्य साधारणत्व काही कथाकारानी निर्माण केले आहेत. यामध्ये प्रामुख्याने नावे घ्यायची झाल्यास नवकथेच्या जुन्या पिढीत गंगाधर गाडगीळ, व्यंकटेश माडगूळकर यांनी आपले अनन्यसाधारणत्व दाखविले आहे. नवकथेच्या दुसऱ्या पिढीत प्रामुख्याने अस्तित्ववादी कथेत दिलिप चित्रे, कमल देसाई आणि लेखन सातत्याने पण थोडयाच कथा लिहिणारे विलास सारंग हे प्रमुख कथाक ार आहेत. यापैकी विलास सारंग यांची प्रयोगशील कथा व तिचे वेगळेपण पाहताना प्रस्तुत कथेत त्यांच्या समकालीन काही कथाकारांचा उहापोह केला आहे. त्यातही सारंग यांची कथा आपल्या वेगळया वैशिष्टयांनी महत्वाची आहे. म्हणून सारंग यांच्या कथेचे वेगळेपण या प्रस्तुत प्रकरणात महत्वाचे आहे. तत्पूर्वी सारंग यांचे समकालीन कथाकार पुढील प्रमाणे आहेत.

**श्याम मनोहर**

जीवनातील भिन्न भिन्न प्रवृत्तीचे शोध, वैशिष्टयपूर्ण क्षण टिपणारी मनोहर यांची कथा आहे. मराठी कथेत प्रयोग करणारा हा कथाकार जीवनातील, समाजातील विविध अनुभव टिपतो. अस्तित्ववादी मराठी कथेच्या जवळ जाणारी मनोहरांची कथा असली तरी जीवनापासूनचा तुटलेपणा त्यांच्या कथेत येत नाही. कथात्मक आकार नसणाऱ्या विस्कळित आणि तुटक अनुभवांचे एकत्रीकरण केल्यासारख्या मनोहर यांच्या कथा आहेत.

माणसामाणसांतील शोध, फॅन्टसी आणि उपहासात्मक निवेदनातून त्यांच्या कथा साकारतात.

'बिनमौजेच्या कथा' आणि 'आणि बाकीचे सगळे ' हे त्यांचे दोन कथासंग्रह १९८० ला प्रकाशित झाले. १९६८ पासून मराठीत कथा लेखनकरणारे हे कथाकार आहेत. पारंपारिक मराठी कथेचा फॉर्म ते बदलतात. समाजातील वर्तमान स्थितीकडे पाहणारे त्यांचे नाट्य तटस्थपणे अनुभवांचे निवेदन करते . नेहमीच्या जीवनातील जीवनानुभव विक्षिप्त नजरेने बघून जीवनातील असंबद्धता टिपतात. विविध रंगाची पात्रे त्यांच्या कथेत येतात. चारचौघांसारखी नेहमी भेटणारी माणसे त्यांच्या कथेत आल्यानंतर मात्र त्यांच्यातले वेगळेपण कथेत श्याम मनोहर दृष्टीस आणून देतात.

तुटक घटनांच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली 'वासू अमक्या तमक्या ठिकाणी ऐसपैस' ही कथा दीर्घकथेसारखी पाल्हाळिक कथा येते. कथेचा विस्तार अति असल्याने ऐसपैस झालेली ही कथा प्रभावहीन व दीर्घकथा झाली आहे. 'कॉम्पीटेशन, रिलेशनशिप, एक वाडा एक जोडपे, आणि बाकीचे सगळे', या (आणि बाकीचे सगळे कथासंग्रहातील) कथातील कथानक चांगले साधल्यासारखे वाटते. तसेच 'बिनमौजेच्या गोष्टी 'या संग्रहातील 'साधकाबरोबर' 'पराजय' 'टाकून दे तो गरीब चेहरा' या कथा प्रभावी वाटतात.

मानवी जगण्यातली असंबद्धता, विरूपता, व्यस्तता त्यांच्या कथेत येते. व्यक्ती आणि कुटुंब, व्यक्ती आणि समाज, व्यक्ती आणि समाजात सामाजिक संस्था विविध समाजातील व्यवसायातून व्यक्तिच्या निर्माण होणारा दर्जा आणि त्यातून निर्माण होणारी सामाजिक भूमिका, जीवनातील विसंगती आणि संगतीहिनता श्याम मनोहरांच्या कथेत प्रामुख्याने जाणवतात. कथेला कथानकाचा विशिष्ट फॉर्म नाही तरीही चांगले परिणामकारक कथानकात त्यांच्या कथामधून जाणवते. त्यांच्या कथानकात सुसंगतीपेक्षा मानवी जगण्यातले, विसंगती आणि विरूपतेतले काही प्रश्न प्रामुख्याने त्यांच्या कथांचा विषय होतात.

मध्यमवर्गीय समाजच मनोहराच्या कथेचा विषय असला तरी गाडगीळांपासून सुरू झालेल्या मध्यमवर्गीय नवकथेत मनोहरांची कथा वेगळा आशय मांडते. मध्यमवर्गीय

जगण्यातले तानतणाव, त्यांच्या जगण्यातील सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक अडथळे आणि त्यामुळे कुढणारी, कुचणारी आणि पुन्हा परिस्थितीशी जुळवून घेणारी माणसे त्यांच्या कथेत दिसतात. मध्यमवर्गीय जगण्यातली संकुचितता आणि त्यातून विशिष्ठ वर्तुळात जगणारी माणसे यांचे प्रभावी चित्रण त्यांच्या कथेत येते. मराठी मध्यमवर्गीय नव्या प्रयोगशील कथेतले वेगवेगळे अधिव्यक्तीचे प्रयोग मनोहर करतात. त्यामुळे मराठी नवकथेच्या परंपरेहून एक वेगळी प्रतिमा ते कथाक्षेत्रात निर्माण करतात.

समकालीन समाज वास्तवाशी सुसंगत राहून नव्याने कथेत प्रयोग करणाऱ्या कथाकारांमध्ये मनोहरांचे नाव घ्यावे लागेल. आशय अभिव्यक्ती आणि कथेचा आकृतीबंध स्वत:ची एक वेगळी शैली निर्माण करणारा हा कथाकार असला तरी अस्तित्ववादी परंपरेतल्या कथाकारांमध्ये स्वत:च्या कथाशैलीचे स्थान मनोहरांनी निर्माण केले आहे. त्यांच्या नंतरही अनुकरणातून अशीकथा निर्माण झाली नाही. नवकथेच्या दुसऱ्या पिढीत सातत्याने आपली कथा आणि कादंबरी लिहून मात्र स्वत:ची परंपर अजुनही मनोहरांनी चालविलेली आहे. त्यांचा अलिकडेच प्रसिद्ध झालेला हा कथासंग्रह याचे उदाहरण म्हणता येईल.

## रंगनाथ पठारे

अलिकडच्या नव्या पिढीतले हे एक महत्त्वाचे कथाकार अस्तित्ववादी पठडीत बसत नसले तरी एक प्रायोगिक कथाकार म्हणून त्यांची नोंद घेणे महत्वाचे ठरते. ग्रामीण आणि नगर या दोन्ही पार्श्वभूमीवर त्यानी कथा लिहिल्या त्यामुळे कृषीसंस्कृतीशी संबधित त्यांची कथा असली तरी नागर पार्श्वभूमी ही त्यांच्या कथेला आहे छोटया छोटया शहरातील वर्तमानकालीन समाजवास्तव आंतरिक संघर्षासह त्यांच्या कथेत येते. अर्धग्रामीण अन् अर्धनागर समाज आणि या समाजातील नवजागृत संवेदनशील मन याचा परिणाम वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर ढोंगीपणान होत आहे. हा ढोंगीपणा आजची जगायची ढोंगी मूल्ये आणि दुर्लक्षित राहिलेले ग्रामीण व नव्या नगर क्षेत्रातील अनुभव आपल्या कथेत पठारे टिपतात. अर्थकेंद्राची निर्मिती करून उभा केलो पैसा आणि

जातीकेंद्रित सत्ता नेतृत्वाच्या नावाखाली निर्माण झालेल्या स्वार्थाच्या झुंडी त्यांच्या कथा कादंबऱ्यात पहायला मिळतात.

'अनुभव विकणे आहे'हा त्यांचा पहिला कथासंग्रह मानवी अस्तित्वाविषयीचे प्रश्न या कथेत पठारे मांडतात. 'अनुभव विकणे आहे' ही डायरी वजा कथा वेगळया प्रयोगातून साकारते. कथेचे लेखनतंत्र आणि भाषेची शैली यांतून त्यांच्या कथेची प्रयोगशीलता महत्वाची आहे. शैक्षणिक क्षेत्र विशेषत: प्राध्यापक विश्वाशी संबधित असणारी त्यांची अधिकाधिक कथा जाणवते. 'स्पष्ट वक्तेपणाचा प्रयोग ' हा त्यांचा दुसरा कथा संग्रह वर्तमान समाजातील वास्तवाचे स्पष्ट आणि परकड मत या कथा संग्रहात येते यातल्या 'सटाणा ते सटाणा' आणि 'न्यूज स्टोरी ' या सारख्या कथा सामाजिक वास्तव उलगडण्या बरोबर कथानायकांचे आंतरिक विश्वही उलगडतात. स्वत:ची तत्वे आणि जीवन निष्ठा ठेवून नोकरी शोधणाऱ्या तरूण प्राध्यापकाला शेवटी नोकरीसाठी तडजोड करावी लागते आणि एक बधिर आणि दांभिक वृत्ती जोपासावी लागते. तसेच जातीय विषमते विरूद्ध असणारा हा तरूण त्याच्या मनातील आंतरिक जातीय विचार या कथेत येतात. तडजोड करीत जगणाऱ्या आणि त्याबद्दल मनातल्या मनात खंतावणाऱ्या तरूण प्राध्यापकाची ही कथा समाजातील बाह्य विश्वा बरोबर नायकाचे आंतरिक विश्वही उलगडते.

'न्युज स्टोरी' सारखे कथा एक वेगळेच तंत्र मांडते. एक पत्रकार संपादकाला विवाहितेच्या मृत्यूची बातमी देतो आहेअसे या कथेचे तंत्र येते. स्त्रीच्या मृत्यूची घटना आणि तिच्याविषयी उठलेले वादळ, खूनाचा तपास आणि तपासातला गोंधळ आणि शेवटी काहीच निष्पन्न न झाल्याने अगातिक झालेला निवेदक अशी या कथेची पार्श्वभूमी येते या कथेविषयी डॉ. अंजली सोमण म्हणतात, "मानवी हितसंबध, स्वार्थ अगतिकता आणि लबाडी यामुळे सद्य परिस्थितीत सत्यशोधन करणे किती अवघड आहे याची जाणीव ही कथा वाचकांना करून देत."[४]

कथेच्या रूढ संकल्पनेला छेद देवून पठारे आपले कथालेखन करतात. 'कोंभालगतचा प्रवास' ही त्याची वेगळीच प्रायोगिक कथा आहे 'आत्मवृत्त'आणि

'मोडलेल्या नायकाची स्वप्ने' या दोन कथा समाजातील ढोंग आणि विसंगतीवर भाष्य करतात. फॅन्टसी वजा नायकाना फडणाऱ्या स्वप्नातून व्यक्तीगत कामप्रेरणा आणि समाजातील ढोंग, अधिकराशाहीखाली दडपलेले कथानायक भेटतात. प्रत्यक्ष जीवनात आदर्शवादाचा पुरस्कार करू पाहणारे हे नायक वास्तवात मात्र मोडून पडतात. 'शोक प्रस्ताव' आणि 'वैकुंठाची माती' या दोन कथेत ही अनाकलनीय कामप्रेरणेची विविध रूपे पठारे शोधतात. संत तुकारामाच्या चारित्र्याविषयी व वैयक्तिक कामजीवनाविषयी नवा विचार मांडण्याचा प्रयत्न पठारे करतात. संताविषयी अशा वेगळया विषयावर केलेले भाष्य म्हणजे पठारेंचे एक प्रायोगिक धाडसच म्हणता येईल.

'अनुभव विकणे आहे.' ही एक उपरोधिक शैलीतला वेगळाच कथासंग्रह आहे. 'रिट्रेचमेंट' या कथेत नोकरी गेलेल्या आणि त्यामुळे कौटुंबिक जीवनात झालेल्या अस्वस्थतेची जाणीव पठारे करून देतात. तर 'अनुभव विकणे आहे' या कथेतला म्हातारा 'अनुभव विकण्याचे दुकान थाटतो' पण म्हातारपणामुळे त्याची होणारी उपेक्षा आणि त्याचे व्यक्तिगत समस्यायुक्त दु:खणे पठारे या कथेत मांडतात. एका उपरोधिक शैलीतून ही कथा चांगला परिणाम साधते. 'चार वासनांध आणि एक म्हातारा योध्दा' पाऊ न पुरूष उंचीच दार' 'रक्तात झडझडता पाऊस ' इ. कथामधील भाषाशैलीचे प्रयोग पाहण्यासारखे आहेत. अत्यंत छोटी छोटी वाक्ये आणि उपरोधिक शैली यामुळे त्याची कथा परिणामकारक बनते. बऱ्याच कथा ह्या व्यक्तिकेंद्री आणि प्रथमपुरूषी निवेदनाच्या आहेत. त्यामुळे मानवी एकाकीपणा आणि व्यक्तिगत प्रश्नाच्या समस्यांच्या जवळ जाणारी त्यांची कथा आहे.

'ईश्वर मृतात्म्यास शांती देवो' हा आणखी एक पठारेंचा अलिकडचा कथासंग्रह लेख वजा कथेची कथनशैली विशेष लक्ष वेधून आहे. अगदी सहाय कथा असणाऱ्या या संग्रहात पठारेनी कथा निवेदनाचे विविध प्रयोग केले आहेत. अर्धग्रामीण अर्धनागर समाजातील ताणतणाव आणि वर्तमान मानसिकतेचा शोध या कथेत पठारे घेतात. यातील 'घडण' सारखी कथा प्रयोगशीलतेचा एक नमुना ठरते. उतारे वजा वर्णनात्मक भाष्य या कथेत येते. 'शरद पवार आणि खाणदानी भिंत' यातून महाराष्ट्रातील मराठा समाज आणि

त्याची खानदानाविषयीची मानसिकता स्पष्ट होते. 'काही खरं नाही' सारखी कथा काही खरं नाही या एकाच विधानावर उपरोधिक भाष्य करीत पुढे सरकते.

अर्धनागर, अर्धग्रामीण आणि अस्तित्वाविषयक जाणीवेची कथा रंगनाथ पठारे लिहितात. कथेमध्ये विविध प्रयोग करणारे अलिकडचे एक प्रायोगिक कथाकार म्हणून त्यांच्या कथा पहायला मिळतात.

**भारत सासणे**

अलिकडचे महत्वाचे कथाकार म्हणून भारत सासणे यांचे कथालेखन पाहता येईल. असांकेतिक विषय, अभिनव भाषाशैली आणि कथन पद्धती सासणे यांच्या कथेत दिसते. 'जॉन आणि अंजिरी पक्षी' हा त्यांचा कथासंग्रह आणि 'कॅम्प आणि बॉबीच दु:ख, चिरदाह' हे दीर्घ कथांचे संग्रह आधुनिक कथाकारांमध्ये दीर्घ कथा लिहिणाऱ्याच्यांत भारत सासणे यांचे नाव घ्यावे लागते परिघाबाहेरचे आणि गुढ कथाविषय त्यांच्या कथेत येतात. छायाचित्राप्रमाणे वास्तववाद मांडणे हे त्यांच्या कथेचे विषय आहेत त्यामुळे त्यांची कथा एखादया चलत् चित्रपटाप्रमाणे कॅम्प आणि तेथील अनुभव हळूहळू मानवी जीवनाशी संदर्भ लावणारा होतो.

'बाबीचे दु:ख' या कथेत बाबी नावाच्या पौंगडावस्थेतील मुलाच्या लैंगिक कुतुहलाच्या आकर्षणाने ग्रस्त असणाऱ्या मुलीच्या मानसिक असंतुलनाची गोष्ट येते मानवी अंतरंगाचे चित्र या कथेत भारत सासणे काढतात.अत्यंत हळूवारपणे मानसिक घटकांचा उकल या कथेत करतात.

मराठवाड्यातील मुस्लीम संस्कृती आणि या संस्कृतीच्या परिघात वाढलेल्या व्यक्तिची चित्रणे त्यांच्या कथेत येतात. सामान्य घटना सामान्य माणसे या बाबतीत साध्या भाषेत निवेदन सलग आणि कालानुक्रमे चित्र घटना मांडल्यासारखे निवेदन असे साध्या प्रकारचे निवेदन असल्याने त्यांच्या कथेत फारशी प्रायोगिकता दिसत नाही. परंतु त्यांच्या कथेची धारणा वैशिष्ठपूर्ण आणि स्वतंत्र आहे असा अभिप्राय म.द. हातकणंगलेकर देतात. वास्तवाचे आकलन ते एक वेगळया तिरकस दृष्टिकोनातून करतात पारंपारिक कथारचनेचा साचा बदलणे हे नव्या प्रायोगिक कथेचे तंत्र आहे. सासणे यांची कथा पारंपारिक कथेचा

पूर्ण साचा बदलणारी नसली तरी विशिष्ट पद्धतीची निवेदनाची रचना करते हे निश्चित निवेदनाची साधी भाषा असली तरी वाचकाच्या मनात निर्माण होणारी प्रतिमा त्यांच्या लेखनाचे वैशिष्टय आहे. अलिकडे त्यांचे 'खेळ', 'आंब्याची सावली','गंगार्पण', 'अवेळ', 'कृष्णजन्म', 'लांडगा', इ. कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.

**अनिल डांगे :-**

स्वप्नमय आभास प्रतिसृष्टी निर्माण करणे आणि मानवी अस्तित्व विषय प्रश्नांचा वेध घेणे हे डांगे यांच्या कथेचे विशेष कौटुंबिक नात्याचे भावविश्व सोडून घराबाहेरील जगाचे दारूण अनुभव शोधणे, तरूण मनाच्या हळव्या प्रेमनिराश भावविश्वाचे चित्रण करणे हे त्यांच्या कथांचे विषय. 'एरियल आणि पोरकं पाखरू' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. निसर्ग, समाज आणि यंत्र या तीन गोष्टी माणसाच्या अस्तित्वाला जोडल्या गेल्या आहेत यातून सुटायचा तो प्रयत्न करतो आमित्यातून सुटणे अथवा अपयश हे डांगे यांच्या कथेचे सूत्र आहे.

कारखाना सारख्या कथेत स्वप्नमयता येते कथेतील मॅनेजरची सुंदर मुलगी आणि गुराख्याची विकृत वासना, नारायणाचा जप, कामगारांचा मटका, हातभट्टी आणि मॅनेजरची शिस्त. मॅनेजरची मुलगी हे सर्वांचे स्वप्न पण तिच्यावरच्या बलात्काराने व खूनाने सर्वांचे स्वप्न धुळीस मिळते.

धक्कादायक आणि अनपेक्षित घटना घडविणे हे डांगे यांच्या कथेचे आणखी एक वैशिष्ठ 'आंधळे स्फिंक्स वारूळ' गारदी, केवडा या सारख्या कथांमध्ये डांगे अनपेक्षित घटना घडवितात. उदा. वारूळ कथेत पन्नास आदिवांसीची प्राणाहुती, गारदी कथेत मध्यमवर्गीय माणसावर झालेला अनपेक्षित हल्ला आणि 'केवडा' सारख्या कथेत सांस्कृतिक संदर्भाना धुडकावून लावणारा नायक. उदा. तीर्थक्षेत्रात कॅबरे पाहणे भटजीला कॅबरे पहायला लावणे, स्वत:च्या आईला विजेचा शॉक देणे अशा घटना त्यांच्या कथेत घडतात. एक प्रकारची सांस्कृतिक बंडखोरी डांगे आपल्या कथेतून करतात.

'अमिबा' सारखी कथा एका विलक्षण स्वप्नमय जगाचे प्रदर्शन घडविते. 'सूर्यकाच आणि यंत्र' सारखी कथा अतर्क्य, अद्भूत आणि चमत्कारिक घडताना दिसते. 'अस्तित्वाचा शब्द' याही कथेत अद्भूत आणि चमत्कारिक गोष्टी घडताना दिसतात.

'एका ओल्या रात्री', 'डबक' यासारख्या कथा आसुसलेल्या उत्सुक प्रणय स्वप्नांना साकार करणाऱ्या तरूण मनांच्या कथा आहेत. अपुरे आणि अस्फुट राहिलेले स्त्री पुरूष संबध, सततचे अंतर, दुरावा व विफलता यांची चित्रे त्यांच्या कथेत येतात. अपुरेपणा हा त्यांच्या कथेचे एक वैशिष्ठ आहे. त्यांच्या कथेतील पात्रेही या अनुषंगानेच येतात.

'साधुवाण्याची नाव' ही त्यांची एकमेव पौराणिक संदर्भ घेवून येणारी कथा आहे. नेहमीची परिचयाची 'सत्यनारायणाची कथा' डांगे यांनी एक वेगळा अर्थ देवून साकारली आहे.ईश्वराला नाकारणारा आधुनिक माणूस या कथेत येतो. मध्यमवर्गीय सुसंस्कृत, सुशिक्षित, शहरी माणसे नेहमीची ओळखीची माणसे त्यांच्या कथेत येतात. परंतु या माणसांचे प्रश्न महत्वाचे आहेत ते डांगे आपल्या कथेत मांडतात. प्रश्नांनी भेडसावलेली ही माणसे त्यांच्या कथेत अनेकदा आत्महत्या करतात किंवा वेड्यांच्या इस्पीतळात जातात. असामान्य विलक्षण कृती करणारी ही माणसे त्यांच्या प्रश्नांचा शोध डांगे यांच्या कथेत दिसतो. आपापल्या भावविश्वात शिरून वाचकांनाही आत्मशोध घ्यायला लावणारी पात्रे त्यांच्या कथेत येतात. त्यांच्या कथेविषयी सुकन्या आगाशे म्हणतात , "विश्वाच्या आदि अंताबद्दलचे प्रश्न सुद्धा येथे उभे करण्याचा प्रयत्न दिसतो पण मुख्यता भोवतालच्या सडलेल्या वांझोट्या जगाचे होणार तरी काय ? व त्या जगाला विटून जाऊन मग त्यातून मार्ग तरी कसा काढायचा? या प्रश्नांभोवती डांग्याच्या कथांचे विश्व घोटाळताना दिसते. हे प्रश्न तर आपल्या जिवाळ्याचे, आपल्यातच आजूबाजूच्या माणसांचे आहेत. जीवनाला अर्थ आहे की जीवन अर्थशून्य आहे ? जीवन सर्वस्वी नियत आहे की माणसाला तरीही काही स्वातंत्र्य असते ? जग सुंदर आहे की कुरूप ? कोणतीच मूल्ये न मानल्याचे ठरविले तर माणूस 'माणूस' राहील काय ? की सर्वच अर्थशून्य आहे ? संस्कृती परंपरा धर्म, श्रध्दा सर्वच तुच्छ मानले, पण मग पुढे काय ? असे मूलभूत प्रश्न

येथे उच्चारले जातात हे डांग्यांच्या कथांचे वैशिष्ट आहे."[५] (सत्यकथा आक्टोबर दिवाळी १९७९ पान नं. ६५)

विज्ञानयुगातल्या आधुनिक अनुभवातून मानवी अस्तित्वाविषयक प्रश्न हा आजच्या कथेचा विषय आहे हाच विषय डांगे यांच्या कथेतून पहायला मिळतो आजच्या अस्थिर अमानुष परिस्थितीत मध्यमवर्गीय माणसावरचा ताण डांगे यांच्या कथेत दिसतो. नवकथेत प्रयोग करणारे, वास्तवाला भिडणारे आणि आभास स्वप्न आणि लेखनातून अनेक प्रश्न निर्माण करणारे हे कथाकार आहेत. त्यांच्याबद्दल वसंत अबाजी डहाके म्हणतात "डांगे यांच्या कथेवर अस्तित्ववादाची छाया आहे मानवाचे स्वातंत्र्य आणि त्याची जबाबदारी ह्या सूत्रांचा अविष्कार त्यांच्या कथातून होतो. डांगे यांची कथा निवेदनाची पध्दत, वास्तव, अतिवास्तव, प्रतिका त्मक वास्तव आणि कल्पनाविश्वात्मक आहे. "[६]

**आनंद विनायक जातेगावकर**

ह.ना. आपटे यांच्या पाल्हाळीक निवेदनशैलीशी नाते सांगणारी जोतगावकर यांची कथा आशयातून आजच्या समकालिन काळातील समस्या मांडते. भोवतालची सामाजिक राजकीय स्थिती मध्यमवर्गीय माणसाचे एकाकीपण, कुटुंब व्यवस्थेचे विघटन मूल्यांचा ऱ्हास ही नवी आशयसूत्रे त्यांच्या कथेत पहायला मिळतात. 'मुखवटे' हा त्यांचा पहिला कथासंग्रह १९७६ साली प्रकाशित झाला. त्यांच्या कथेचा प्रवृत्तीधर्म जरी परंपरावादी असला तरी कथेचा आशय नव्या अस्तित्ववादी कथेशी नाते सांगणारा आहे. "मध्यमवर्गीय माणसाची आजची एकटेपणाची दुखरी जाणीव त्यांच्या कथेतून व्यक्त होत असली तरी जीवन निरर्थक आणि विसंगतीपूर्ण असल्याची व नियतीच्या सर्वभक्षीपणाची ठाम जाणीव आहे, असे अजूनतरी दिसत नाही. जीवनात सतर्क्यता स्वीकारली तरी तर्काचे महत्व ते अमान्य करीत नाहीत. जीवनातील पानगळ पडझड कंटाळावाणेपणा, नश्वरता मृत्यूचे सर्वभक्षीपण जमेस धरून ही जीवनजगले पाहिजे अशी जाणीव त्यांच्या कथा देतात."[७] (मराठी साहित्याप्रेरणा स्वरूप - १७४) असे म.द. हातकणंगलेकर त्यांच्या कथाविषयी म्हणतात.

'गुलमोर', 'भातुकली' यासारख्या त्यांच्या मध्यमवर्गीय जाणीवा देणाऱ्या कथा विशीच्या उंबरठयावरील तरूणाचे मनोविश्व साकारतात. मानवी एकाकीपणाची शोकांतिका आणि एकाकीपणाची अपरिहार्य आत्मनिष्ठा. समूहात राहूनही प्रत्येकाच्या वाटयाला आलेला एकाकीपणा आणि अवतिभवतीच्या वातावरणातील भयावस्था याला सामोरी जाणारी पात्रे त्यांच्या कथेत दिसतात. (उदा. अग्नीजाळी,अहिल्या,नचिकेत, सनई) त्यांच्या कथेत एकप्रकारची थंड अलिप्तता जाणवते. माणसामाणसातील दुरावा हे माणसाच्या दु:खाचे कारण असते तसेच नियतीचा न्यायही अतर्क्य, अपरिहार्य असतो. आणि या न्यायाने दिडमुढ झालेला माणूस त्यांच्या कथेत दिसतो. उदा. मुखवटे, अखेर) विश्वाच्या अफाट पसाऱ्यात माणसाच्या अक्षुद्रतेची जाणीव, क्षुद्र जाणीवतून अस्वस्थ, हताश झालेला माणूस आणि वांझपणाने जगणारा माणूस, माणसाच्या जगण्यातील ही निरर्थकता सम्राटच्या आयुष्यातून उपराधिकपणे 'वेलाटी' या कथेत मांडतात.

आधुनिक विज्ञानवादी जगातल्या माणसाचे जगण्याचे प्रश्नच त्यांच्या कथेत येतात. मानवी प्रश्नापासून मानवी जाणिवेला मुक्ती नाही. हे ही त्यांच्या कथेत दिसते. उदा. सिद्धार्थ ही कथा.

'माझ वय बत्तीस' या सारखी कथा मृत्यूच्या क्षणीही आपल्या प्रौढतेची जाणीव करून देते. मृत्युची निर्णायकता मनुष्याच्या हातात नसते म्हणूनच 'कवडसे' या कथेतील महर्षिंना इंद्रपदही नको आहे त्यांना फक्त कायमसाठी मरायचे आहे. मृत्यूला सामोरे जाणारा आजचा माणूस हसत हसत गेला तरी मृत्यूचे भय आणि त्याची एकाकी जाणीव ही कायम असते. 'श्रीनिवासच सोळावं वर्ष', 'पावलं' यासारख्या कथा मृत्युविषयी हीच जाणीव देतात.

परंतु जोतगावकरांच्या कथेतील एकाकीपण हे जगावेगळया आणि विक्षिप्तणा दाखविणाऱ्या पात्रांतून येत नाही. त्यांच्या कथेतील पात्रे लौकिक जगातलीच असतात. जीवनाच्या चौकटीत राहणारी कीतीही एकटी असली तरी व्यापक अर्थाने ती सगळयात राहणारी माणसे त्यांच्या कथेत येतात.

जातेगावकर काही पुराणकथाही लिहितात. 'अहिल्या', 'कवडसे', 'अखेर' या पुराणकथा असल्या तरी त्यातील व्यक्तिमनाचा शोध घेणाऱ्या या कथा आहेत. त्यांच्या कुटुंब कथेविषयी डॉ. सुधा जोशी म्हणतात. "जोतेगावकरांच्या कथेतील कुटुंबचित्रण जसे सामाजिकतेच्या संदर्भात आलेला नाही तसेच विशिष्ट संस्कृती मूल्यांच्या गौरवाची जाणीवही त्यात गर्भित नाही आणि म्हणून त्यांच्या कथेतील कौटुंबिकता य.गो. जोशी वा.प. महादेवशास्त्री यांच्या कथेतील कौटुंबिकतेहुन वेगळी ठरते."[८] मध्यमवर्गीय कुटुंबकथेतील मूल्यसापेक्षता जातेगावकरांच्या कथेत दिसत नाही त्यांची कथा मूल्यनिरपेक्ष आहे मूल्यव्यवस्थेच्या जाचक कल्पनातून त्यांची पात्रे बाहेर पडू पाहतात. कुटुंबव्यस्थेच्या चित्रणा बरोबर त्यांच्या पात्रांची एकाकीपणाची जाणीव ही महत्वाची ठरते म्हणुनच त्यांची कथा जुन्या पंरपरेचीशैली अविष्कृत करत असली तरी नव्यातला प्रयोग करते. नवकथेनंतरच्या कथेच्या वैशिष्ट्यांसह त्यांची कथा येते संथ निवेदन आणि तपशीलवार मनोदर्शन त्यांच्या कथेत येते. हालचालींची तपशीलवार कृतीवार रेखाटने, मनोवस्थेतील भाव स्पंदणे आणि त्यातील लय यामुळे त्याची शैली किंचित पाल्हाळिक होते. त्यांच्या लेखनशैली बद्दल डॉ. सुधा जोशी म्हणतात, "गिरवल्या सारखे भाषेचे वळण, विशिष्ट शब्द प्रयोगाची पुन्हापुन्हा लागणारी ठेच यातून त्यातील आवर्तपरताच सूचित होते."[९]

**नरेश कवडी**

मालिका कथा लिहिणारे हे एक प्रयोगशील कथाकार 'बिअरचे सहा कॅन्स' आणि 'चुळचुळ मुंगी पळीपळी कंटाळा' हे दोन कथासंग्रह संवेदनशील मनाचे चित्रण संज्ञाप्रावाहातून करणे हे त्यांच्या कथांचे विशेष जीवनातल्या कंटाळवाणेपणात आणि एकाकीपणातही एक प्रकारची कलात्मकता असते हे त्यांच्या कथांमधून दिसते. मानवी जगण्यातला बोअरडम आणि कंटाळा त्यांच्या कथेत दिसतो.

"देवानं पुष्कळ गोष्टी अशा कंटाळयाला कंटाळूनच काहीतरी करायच म्हणून केल्यासारख्या वाटतात. वाटतात की नाही ?"[१०] असे प्रश्न निवेदकाल सतत पडतात. नोकरीतून कमी केलेला निवदेक घराकडे यायला निघतो पण घरी न जाता आपली पत्नी शालिनी हिला तोंड कसे दयावे आणि चार मुंलाचे काय व्हायचे ? या प्रश्नानी विचारमग्न

असलेला नायक भटकत राहतो. "पण आता जायचं कुठ ? घरी? घरी जाऊ न काय करायचं? मी एक शब्द बोलायचा .... मग शालिनी दोन ... मग मीचार.... तिंन आठ ... मग मी सोळा... तिन बत्तीस ...हरे राम !"[११] (एका हाताची टाळी - पान नं. ८) घरी यायचं नाही म्हणून तो वेश्या वस्तीत जातो पण तिथही तो तसाच परत येतो. सगळे पैसे खर्चून टाकतो. सिगरेटी ओढत हिंडतो.

धर्म आणि अध्यात्मा बद्दल उदासिन असलेला नायक परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल अनेक प्रश्न विचारतो. अध्यात्माची व्याख्यानं ऐकून त्याला एकाच ठिकाणी गुरफटल्यासारखे होते. निवेदक म्हणतो, "पुढं सातआठ महिने आपण एक कुंत्र आहोत न् आपलंच शेपूट पकडायची धडपड करतोय असेच वाटायचं "[१२] (मूड नसताना जन्मांला आलेल्याची गोष्ट) पान - ३४ लोक कीर्तन ऐकून बाहेर पडतात पण हा गर्दीतून आत जाण्याचा प्रयत्न करतो. देवाजवळ तासनंतास बसतो देवाविषयी त्याच्या मनात पुन्हा पुन्हा प्रश्न निर्माण होतात. (एका जनार्दनी धरा बळकट मेंढी) शामरावांच्या बरोबर नायक सिध्दकडे जातो पण तिथे ही त्याला विचित्र वाटते. सिध्दाचा उपदेश बलात्काराप्रमाणे वाटतो. "आय वॉज बिईग रेपड " अशी त्याची अवस्था होते.

'चुळचुळ मुंगी पळीपळी कंटाळा' यासारखी कथा तर मानवी अस्तित्व विषयक अनेक प्रश्न निर्माण करते. संज्ञा प्रवाहातले मानवी मनातले निवेदकाच्या मनातले अनेक प्रश्न सर्वसामान्य लोकांनाही पडत असतात. हे प्रश्नच नायकाचेही आहेत. 'गाढव तरी नाहीतरी रेसचा घोडा तरी' सारख्या कथेत उपरोधिक आणि मिस्किलपणे निवेदक वास्तवावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करतो. 'मुंगी उडेल आकाशी' या कथेत स्वप्नात आणि शक्यतेच्या जगात जगणारे नायक व त्यांचे कुटुंबिय दिसतात. नायकाच्या नोकरी गेल्यापासूनच्या दुपारपासून रात्री झोपेतल्या स्वप्नापर्यंतचा संज्ञाप्रवाह प्रस्तुत कथामालिकेत दिसतो. ही कथामालिका स्वतंत्र वाचल्या तरी त्यातून मानवी अस्तित्वाचे प्रश्न स्वतंत्रपणे जाणवतात. केवळ एका दिवसाच्या अनुभवघटकातून या कथा मांडल्या आहेत.

कोणताही फॉर्म नसलेल्या या कथा वाचकावर मात्र परिणाम करतात. कथांचे निवेदन सूक्ष्म मर्मभेदी, गंभीर आशय आणि मार्मिक चिंतनातून होते प्रतिभचा एक नवाच

आशय आणि अनुभव या कथा मालिकांमधून मिळतो. कधीकधी निवेदनात काव्यात्मकता येते तर कधीउपरोधिक समाजव्यवस्थेवरचे भाष्य येते. संस्कृती आणि सांस्कृतिकमूल्यांना आव्हान करणाऱ्या या कथा वाटतात.

'बिअरचे सहा कॅन्स' या कथा संग्रहातही हाच अनुभव नरेश कवडी व्यक्त करतात.

**एस. डी. इनामदार**

नवकथेच्या प्रवाहात अत्यंत लक्षणीय असे कथालेखन करणारे हे कथाकार आहेत. समकालीन जीवनाचे विरूपाकार, परकेपणा,हरवलेपणा असे संमिश्रभाव मानवीमनात कोलाहाल निर्माण करतात. व्यक्तिच्या अंर्तमनात खोल दडलेली भोवतालची वास्तव परिस्थिती ते आपल्या कथेतून व्यक्त करतात. मानवी जीवनाचे मूळ वास्तव जन्म मरण, लैगिंकता, स्त्री- पुरूष संबंध, व्यक्ति समष्टी संबंध, मानवी जीवनावर वर्चस्व गाजवणाऱ्या नियती - दैव शक्ती यामध्ये आहे. त्यातून कळसूत्रा सारखी स्थिती प्रत्ययाला येते. हे अस्सल वास्तव त्यांच्या कथेत येते. प्रयोगशीलता आणि गंभीर लेखन करणाऱ्यांना आज वाईट दिवस असले तरी नव्या कथेत प्रयोग करणारे ते एक सर्जनशील कथाकार आहेत.

**काही प्रयोगशील स्त्री कथाकार**

मराठी कथेत प्रयोगशील कथा लिहणाऱ्या कथाकरांमध्ये कमल देसाई नंतर गौरी देशपांडे , विजया राजाध्यक्ष, सानिया, आशा बगे, तारा वनारसे, उर्मिला सिरूर इ. कथालेखिकांच्या कथा उल्लेखनीय आहेत. पारंपारिक कुटुंबविश्व, पुरूषप्रधान वर्चस्व, संसारी स्त्रीच्या समस्या, विधवा - कुमारिका यांचे प्रश्न याशिवाय वेगळे अनुभव विश्व आजच्या स्त्रीकथाकारांनी मांडले आहे. नव्या कथेत नव्याने प्रयोग करणाऱ्या या स्त्रीयांचे कथालेखन समकालीन कथेत महत्वाचे ठरते.

कमल देसाई यांचे कथा लेखन नवकथामध्ये महत्वाचे आहे. मनोव्यापाराचा वेध होण्याच्या प्रयत्नातून कमल देसाई यांची कथा गतिमान होते. जगात राहून ही जगाकडे अलिप्त पाहणारा, थंड कोरडा, तुसडा चिंतक कमल देसाई यांच्या लेखणीत दडला आहे

असे वाटते. १९६० नंतर त्यांनी लिहिलेल्या 'काळा सूर्य' आणि 'हॅट घालणारी बाई' या दीर्घ कथा (लघु कांदबऱ्या) समर्थपणे मांडल्या आहेत. दिलिप चित्रेंच्या नंतर अस्तित्व वादाचा एक नवा पैलू आणि प्रयोगशील कथेचा एक नुमना स्त्रीयांच्या कथेत प्रथमच कमल देसाई यांनी आणला आहे. स्त्री देह हाच मुळात अत्याचार व अन्यायाला नैसर्गिक आणि पोषक आहे असे कमल देसाईना वाटते. पुरूषाला स्त्रीचा देह हा संपूर्णपणे दान करावा लागतो. हा पारंपारिक स्त्रीयांच्या कथेचा साचा कमल देसाई वेगळया पद्धतीने मांडतात. स्त्रीला ओरबडून आणि रक्तबंबाळ करून टाकणारा पुरू ष आणि स्त्री पुरूष संबंधातील वैरभाव, हिंस्त्रता त्या आपल्या कथेत मांडतात. नियतीच्या आधिन असलेली स्त्री आणि एखादया प्रसंगी एखादी व्यक्ती कशी वागेल हे नियतीच ठरवत असते. त्यात बदल करणे हे व्यक्तिच्या हाती नसते. नियतीला सर्वेसर्वा मानणाऱ्या या कमल देसाईच्या कथेत येणारी पात्रे ही तटस्थ, अलिप्त आणि कोरडी असतात. व्यक्तिकेंद्री आणि एकाकी असणारी ही स्त्री पाने गुदमरलेली आणि एखाद्या विषयी आवड वाटली तरी तटस्त राहणारी येतात.

त्यांच्या 'रंग' या कथा संग्रहातील नायिका अशाच अलिप्त आणि वस्तुनिष्ठ भूमिका घेणाऱ्या येतात. क्रिया शून्य असणाऱ्या या नायिका पदरी पडलेल्या ठराविक रस्त्यांने जाणे पसंत करतात. त्यामुळे कथेचे निवेदन ही कंटाळवाणे, परके आणि अर्थशून्य वाटते. कंटाळवाणे आणि सक्तीचे जगणे त्यांच्या कथेत येते त्यामुळे जगण्यातील क्षुद्र मांडणी त्यांच्या कथेत येते. कथेत नायिका कोणत्याही कथेत एकाच तोंडावळ्याच्या येतात. तरीही काही ठिकाणी स्त्रीया स्त्री जीवनाचा नवा अर्थ शोधताना दिसतात. (श्राद्ध) त्यांच्या कथे विषयी चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, "१९९४ साली लिहीलेल्या 'श्राद्ध' या कथेत स्त्रीच्या जीवनाचा नवा अर्थ नव्या मार्गाने शोधण्याचा प्रयत्न दिसतो. परंपरा नाकारणारी स्त्री निर्सगत:च एक शक्ती आहे. असा विचार या कथेत मांडला आहे. कमल देसाईच्या कथा विचार मंथनाच्या आहेत. परंपरा व नवता या दोन ध्रुवात हेलकावणाऱ्या प्रामाणिक व धाडसी मनाचा अविष्कार आहेत."[१३] कमल देसाईच्या कथा बहुतेक ठिकाणी एक सुरी असल्यातरी या कथात नव्याने स्त्री जीवनाचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न दिसतो. मनोव्यापाराचा शोध आणि व्यक्ति मनाचे विविध स्थर त्यातील कंगोरे संज्ञाप्रवाहातून

जाणवतात. उलटसुलट अनुभव विश्वाच्या मांडणीतून त्यांची कथा वाचकांवर परिणाम करणारी ठरते. कुटुंब जीवनातील एक वेगळे भावना विश्व स्त्रीच्या भावना विवश वृत्तीपेक्षा वेगळया पद्धतीने मांडतात.

नवकथेत स्त्रीयांच्या कथा लेखनात वैशिष्ट्य पूर्ण आणि परिणाम कारक आशय मांडणारी कमल देसाई यांची कथा आहे. प्रायोगीक आणि अस्तित्ववादी कथेच्या जवळ जाणारी कमल देसाई यांची कथा आहे. त्यामुळेच समकालीन त्यांच्या कथेत संदर्भ महत्वाचा ठरतो.

**सानिया**

आतापर्यंत मराठी कथेत सहा कथासंग्रह प्रसिध्द करून १९८० ते १९९० च्या दशकात स्त्रीयांच्या कथाक्षेत्रात महत्वाची कामगिरी करणाऱ्या सानिया यांच्या कथा आहेत. त्यांच्या कथेत स्त्रीला प्रथम स्थान असते. आधुनिक जगातील उच्चभ्रु स्त्रीयांचे दु:ख त्या मांडतात. विचार करायला लावणाऱ्या या कथा समाजातील समाजरचेबाबत शंका मांडतात. समाज व्यवस्था आणि समाज संस्थाच्या बद्दल संशयी असणाऱ्या त्यांच्या कथेतील नायिका आहेत. दिवसें दिवस या कथा प्रगल्भ होत चालेल्या आहेत. हळव्या, आत्ममग्न सुटा माणूस आणि त्याच्या भावविश्वातील गुंतागुंत असणाऱ्या व्यक्तिरेखा त्यांच्या कथेत येतात. अंतर्मुख असणाऱ्या माणसांचे विश्व आणि बाहय घटनांची गर्दी नसलेले विश्व वाचकांना गुंतवून टाकते.

कथेतील व्यक्तिरेखा उच्चभ्रु वर्गातील असल्याने त्या तल्लख बुध्दीमान आणि संवेदनशील असतात. भौतिक प्रश्नांपेक्षा विविध नात्यांमधून निर्माण झालेले प्रश्न त्यांच्या कथेत महत्वाचे असतात. कथेची शैलीही उच्चभ्रु अभिरूची दर्शकच येते. कथेतील भेटीगाठीतील चर्चेमुळे त्यांची कथा पाल्हाळिक होते. मानवी नात्यातील तणाव वारंवार त्यांच्या कथेत येतात. स्त्रीयांच्या नातेसंबंधातून हा तणाव असला तरी स्वत:च घडण स्वत: करणाऱ्या कोणाचा आधार न घेणाऱ्या जवळिकता असूनही अंतर ठेवून वागणाऱ्या नायिका त्यांच्या कथेत येतात.

त्यांच्या कथेविषयी अंजली सोमण म्हणतात "विजया राजाध्यक्षा प्रमाणे सानियांच्या नायिका हळव्या, रोमॅटिक आणि आत्ममग्न असतात त्या स्त्रीयांच्या तरल दु:खाच्या छटा बारकाईने टिपतात. सानियांची संथ लयीत उलगडत जाणारी कथा वाचकांच्या मनात शिरते मात्र नायिकांच्या दु:खामागील सामाजिक संदर्भ त्यांच्या कथेत व्यक्त होत नाहीत. त्यांच्या बऱ्याच कथा आकारने दीर्घ असतात त्यांच्या कथा वाचकांना फारसे काही नवे सांगत नसल्यामुळे त्यांच्या कथातील, विशेषता दीर्घकथातील पसरटपणा खटकतो."[१४]

**आशा बगे**

प्रादेशिक वेगळेपणातून वऱ्हाड प्रांताचे चित्रण करणाऱ्या आशा बगे या समकालीन स्त्री कथाकार आहेत. १९८० नंतर त्यांचे लेखन महत्वाचे आहे. कथा आणि दीर्घ कथा या दोन्ही फॉर्म मध्ये आशा बगे लेखन करतात. माणसामाणसातील भावबंध पुन्हा पुन्हा तपासून पाहणे नात्याचे लेबल न डकवता येणाऱ्या अलवार स्त्री पुरूष भावबंधाचा शोध त्यांच्या कथेत घेतलेला दिसतो. परंपरेने आलेले आणि आधुनिकतेने स्वीकारलेले असे आंतरिक ताण त्यांच्या कथेत पहायला मिळतात. स्त्रीच्या सत्वाची आणि स्वत:हाची ओढ, वात्सल्याच्या अतूट बंधनाने जगाला कवळू पाहणारी दृष्टी, आपल्या घराशी, कुटुंबाशी आणि मातीशी असणारे नाते त्या मांडू इच्छितात. आशा बगे यांची कथा एका नाविण्याचा शोध घेते मित्र, पती, मुलगा आश्वासक आशा भिन्नभिन्न भूमिका मधील 'निर्मळ शुद्ध' बंद शोधणे हा कथेचा आत्मा आहे, तर अस्सल मराठी प्रतिभा सृष्टी, आतस्पानी साधीसुधी शैली आणि माणसामाणसामधील खोल भावबंधा विषयी आश्वासक गाढ संमज हे या लेखिकेचे सामर्थ्य आहे. आश्रितांचे दुख: ही आशा बगे मानतात. पुरूष प्रधान संस्कृती दडपलेली आश्रित स्त्री, अनाथ, किशोरी यांची ही कथा त्या मांडतात. (सायकल, पूजा) विजया राजाध्यक्ष, वसुंधरा पटर्वधन यांच्या कथेतील स्त्री चित्रणाची छाप आशा बाईच्या कथेवर आहे.

१९८० नंतर त्यांनी कथाकार म्हणून नावलौकिक मिळवला. 'अत्तर, मांडव, चंदन, अंजन' हे त्याचे कथा संग्रह प्रसिद्ध आहेत. संगीताचा वापर त्या मोठया खुबीने

आपल्या कथेत करतात. त्यांच्या कथेविषयी अंजली सोमण म्हणतात, "त्यांची कथा मुलत: मनोविश्लेषण प्रधान असते. ती संथ लयीत उलगडत जाते. आकाराने लहान मोठी कशीही असली तरी अनुभूतीत तीव्र असते. अतीरंजन एकारलेपणा किंवा प्रचारकीबाणा आशा बगेंच्या कथेत दिसत नाही. अगदीच स्त्रीयांचे दु:ख मांडताना सुद्धा हे त्यांच्या कथेचे एक सामर्थ्य आहे. "[१५]

१९८० नंतर स्त्री कथाकारांनी पारंपारीक स्त्रीयांची दु:खे आणि कौटुंबिक भावविश्वापेक्षा वेगळी कथा लिहण्याचे प्रयत्न केले आहेत. पुरूषांच्या कथेत न आलेली काही खास असे स्त्रीयांचे अनुभव मांडले आहेत. स्त्रीयांचे काही खास अनुभव विश्व स्त्रीयांच मांडू शकतात. हे नवकथेतल्या स्त्रीयांच्या कथेतून दिसून येते.

अलिकडे ८० नंतर कथालेखन करणाऱ्या स्त्री कथाकारांनमध्ये सुधा नरवणे, उर्मिला सिरूर, लिला श्रीवास्तव, ज्योत्स्ना देवधर , सुनिता आफळे, रेखा बैजळ या कथालेखिकांचे कथाक्षेत्रातले कार्य महत्वाचे आहे. विस्तार भया अभावी त्यांच्या कथेचे विवेचन केले नाही. तरी ही नव्या स्त्रीचा अविष्कार थेट आणि आक्रमक पद्धतीने नव्या कथालेखिका करतात. स्त्री जीवनातले अनेक अनोखे पैलू वाचकां समोर आणतात. हे निर्विवाद सत्य आहे. सावध आणि अंतर्मुख होऊ न लेखन करण्याकडे अलिकडील स्त्रीयांचे लक्ष आहे.

**सारंग यांच्या कथेचे वेगळेपण**

नव्या दृष्टीचा कथाकार म्हणून सारंग यांच्या कथेक डे पहावे लागेल. सोलेदाद (१९७५) आणि 'आतकं' (१९९९) हे त्या चे दोन कथा संग्रह प्रसिद्ध आहेत. एक नवी सर्जनशीलता त्यांच्या कथेत पहायला मिळते. त्यांच्या कथा वाचताना रूढ मराठी कथेची परंपरा आणि त्यांची कथा यातले वेगळेपण ठशीवपणे पहायला मिळते. कथेची अभिव्यक्ती, त्यांचे आशयसूत्र, त्यांच्या कथेतील जीवन चित्रण भाषा आणि तंत्राच्या बाबातीत हे वेगळेपण जाणवते. वाचकांच्या अंगवळनी पडलेली कथा रूढ संकेत व्यूहास नाकारून आपली नवी कथेची दृष्टी सारंग यांनी मांडली आहे. आत्मकेंद्री, जीवनापासून तुटलेले परकीय वाळणाचे साहित्य म्हणून साहित्याच्या बांधि लकी वाल्यांनी सारंग

यांच्यावर केलेली टीकाच सारंग यांच्या कथेचे अनन्यसाधारणत्व पटवून देते. मराठी कथेत विशेषता नवकथेत काळोघात अनेक बदल झाले, प्रयोग झाले. अनेक नव्या वळणाच्या कथाची भर त्यात पडली. पण हे सर्व मराठी वाचकांने विनासायास पचविले. नवी कथा वाचकांनी आपल्या रूढ वाचन प्रक्रियेतून पचविली. परंतु सारंग यांची कथा मात्र मराठी कथा परंपरेच्या वाचन प्रकियेत अडथळा आणणारी आहे. कथण,पात्रचित्रण, घटना, प्रसंग हे कथेचे पारंपारिक घटक असले तरी सारंग याच घटकाचा वापर करून कथा विशिष्ट आणि वेगळया तंत्रानी मांडतात. त्याच्या केथे विषयी वसंत पाटणकर म्हणतात, “विलास सारंग यांच्या कथा वाचताना प्रथम दर्शनिच तिचे रूढ मराठी कथेपेक्षा असेलेले वेगळेपण ठशीवपणे लक्षात येते. हे वेगळेपण या कथांची आशयसूत्रे, तिच्यातील एकूण जीवनीचित्रण, तिच्यातील स्थल काल, तिच्यातील तंत्रे, तिची भाषा या सर्वच गोष्टीबाबत दिसून येते मुख्य म्हणजे या कथेतील जीवनदृष्टी व कलादृष्टी रूढ मराठी कथेपेक्षा मोठया प्रमाणात वेगळी आहे.”[१६]

नवकथेत केवळ मनोविश्वात्मक आणि संज्ञाप्रवाहाचा व्यापार महत्वाचा होता परंतु सारंग यांना केवळ इतकेच अपेक्षित नाही. त्यांच्या कथेतही हा संज्ञाप्रवाह, मनोविश्लेषण येते परंतु ते त्यांचे अंतिम लक्ष्य नाही. तर मानवी जीवनातील विविधतेचा शोध आणि हा शोध घेण्यापूर्वी मानवाचा अस्तित्वशोध त्यांच्या कथेत महत्वाचा आहे. कथानक विरहित कथा पण कथनातून विचारांचा पीळ महत्वाचा आहे. आधुनिक जगण्यामध्ये जगण्याबरोबरच मानवी देहाचे प्रश्न महत्वाचे आहेत. माणसाच्या असते पणात बाहयता न दिसणाऱ्या पण अत्यंत महत्वाच्या की ज्याशिवाय त्याचे असते पण शक्य नाही अशा दुर्लक्षित घटकांवर सारंग आपले लक्ष्य केंद्रित करतात. त्यांना मानवी अस्तित्वाचे प्रश्न महत्वाचे वाटतात.आधुनिक माणसाला भेडसावणाऱ्या अनेक आधुनिक प्रश्नांचा शोध ते आपल्या कथेत घेवू पाहतात. मानवी अस्तित्वाविषयीच्या या प्रश्नांची चर्चा आजपर्यंत कोणत्याही तत्वज्ञानानी केली नाही. उलट तत्वज्ञानातून माणसाला पदरी भ्रमनिरास आला आहे. परंतु सारंग मानवाचे हे अगम्य आणि अतिभौतिकीय प्रश्न मांडण्याचा प्रयन्त करतात. त्यामुळे त्यांच्या कथामध्ये असंबद्धतेची आणि अस्वस्थतेची पेरणी होते.

'भय' आणि 'मैथुन' या मानवी जगण्यातला अपरिहार्य आदि आदिम प्रेरणा आहेत. किंबहुना मानवप्राण्याचे जगणे या दोन गोष्टीनीच कमी अधिक प्रमाणात व्याप्त आहे. त्याची छाया मानवाच्या वर्तमानजगण्यावर कायम आहे. या अपरिहार्य घटकांची उकल ते आपल्या कथेत करू पाहतात. समकालीन माणसाच्या जगण्यातले एकटेपण, सतत राहणारी चिंता, जगण्यातली असुरक्षितता आणि मानवनिर्मित समाजसंस्था, आध्यात्मिक संस्था आणि भौतिक गोष्टींची त्याच्यावरील दहशत यातून सुटू पाहणारा माणूस त्यांच्या कथेत येतो. मानवनिर्मिती मूल्यव्यवस्था, नीतीचे प्रश्न आणि नात्यांचे प्रश्न हे सतत भेडसावणारे असले तरी त्यांच्या विषयीची माणसाची कायमची ओढ आणि त्यांची शक्यता यांना सारंग आपल्या कथेच्या आशयसूत्रात पकडतात.

आणखी एक म्हणजे सारंग यांच्या कथामध्ये विश्वव्यापक अनुभव पकडण्याची क्षमता आहे. मध्यमवर्गीय भारतीय कुटुंब व्यवस्था आणि मर्यादित विश्वामध्ये रमणारी मराठी कथा बाजूला सारून ती अनुभवाच्या व्यापक कक्षा धुंडाळताना दिसते. त्यांच्या सोलेदाद व आतंक मधल्या कथा कधी मुंबईत घडतात, कधी खेडयात घडतात, तर कधी पाश्चात्य देशातल्या राजकीय वातावरणात घडतात. त्याचप्रमाणे त्या कधी निर्जन बेटावर व अतिभौतिक विश्वातही घडतात. बऱ्याच कथा वास्तवातल्या नसल्या तरी त्यांच्या कथेत निर्माण झालेले वास्तव आपण अनुभवत आहोत असा अनुभव वाचकाला येतो. हा त्यांच्या कथेतला अनुभव ते कधी कधी वास्तवाच्या पलीकडे फॅन्टसीच्या विश्वात नेतात पण हे फॅन्टसीचे विश्वाही नाकारता न येणाऱ्या मानवी जगण्यातल्या वास्तवाचे चित्रण होते. त्यांच्या कथेतल्या कल्पना विश्व काल्पनिक वाटत नाही तर ते वास्तविक मानवी अनुभवांच्या कक्षेत येते. कारण या फॅन्टसी मध्ये येणारे प्रश्न हे खरेखुरे आजच्या मानवी देहाला आणि मनाला भेडसावणारे प्रश्न असतात. वेगवेगळया प्रश्नातून मुक्त होऊ पाहणारा माणूस इच्छा असून ही तो मुक्त होऊ शकत नाही. उदा. टेक ऑफ मधील नायक, गर्भवती मधील नायक (कलाकृतीच्या अविष्कारातून मुक्त होवू पाहतो.) रूपांतर मधील प्रणय शिश्नात रूपांतरित होऊन ही मुक्त होवू शकत नाही. सुखकर्ता दुखहर्ता मधील नायक अध्यात्मिक दहशतीपासून मुक्त होवू पाहतो. कस्तुमृगचा नायक मानवी नात्यातून मुक्त होवू शकत नाही.

माणसाचे मूलभूत एकाकीपण आणि एकाकीपणातून सुटण्यासाठी त्याची धडपड तरी शेवटी त्याचा भ्रमनिरास हा आशय ही त्यांच्या कथामध्ये येतो. 'चिमाकाय कामाची' कथेचा नायक नाती प्रस्थापित करतो पण त्यातून त्यांची सुटका होत नाही. इतिहास आमच्या बाजूला आहे. या कथेचा नायक नाती निर्माण करतो व पुन्हा ती तोडतो. क्रूसोचा नायक एकटेपणातुन बेटावरून सुटू पाहतो पण क्रुसाखालीच त्याचा मृत्यू होतो. तरीही नाती प्रस्थापणेची शक्यता माणूस टाळू शकत नाही.

त्यांच्या कथेत असंबंद्ध, अनपेक्षित आणि अतकार्य घटना वारंवार येतात. रोजच्या जगण्यातील आणि नेहमीच्या कथा परंपरेतील घटना प्रसंगातील सुसंगती पेक्षा विसंगती नेहमी जाणवतो. तरी त्याच्या कथेतील अनुभव घटकांचा परिणाम कायम राहतो. मानवी जीवनातील विसंगती, विचित्रपणा आणि विक्षिप्त स्वभावाने जगणारी पात्रे येतात. कथानक कोणत्या क्षणी अनपेक्षित कलाटणी घेईल हे सांगता येत नाही. व्यक्तिरेखा आणि घटना प्रसंग पुढे कोणते वळण घेतील हे सांगता येत नाही. त्यामुळे त्यांच्या कथेमध्ये अनपेक्षितता आणि असंबंधतेमुळे शक्यतेची जाणीव कायम राहते. काही अर्तक्य घटना मध्ये गर्भवती कथेतील दाराची भूमिका, सुखकर्ता दुखहर्ता मधील गणपतीचा उठाव कु रमा पुलाव मधील पुतळयाचा उठाव पुतळयाचे देहाचे उत्सर्जन आर्ध्यामुर्ध्या मधील स्त्रीयांचे विश्व आशा घटना येतात पण या घटनातून मानवी जगण्यातल्या अनेक वास्तव सत्य आणि अपरिर्हाय पैलूवर प्रकाश पडतो.

सारंग यांच्या कथा अनेक असल्यातरी कथेचे निवेदन तंत्र आणि आविष्करण प्रत्येक कथेचे वेगळे येते. कथेतील अनुभवाची अवकाशही वेगळे येतात त्यामुळे त्याची प्रत्येक कथा वेगळी ठरते. एक तंत्र तीचतीच शैली सारंगच्या कथेत कधीही येत नाहीत. शैली आणि तंत्राचे अनेक प्रयोग ते करतात. मराठी कथेत अपरिचत असलेले तंत्र आणि कधीही न अविष्कृत झालेली स्वतंत्र शैली प्रत्येक कथेच्या बाबतीत सारंग नव्याने वापरतात. कथेत येणारी पात्रे विशिष्ट स्थरातील येत नाही. म्हातारे, तरूण, प्राणी, पक्षी, शुद्र किटक ही त्याच्या कथेत पात्र होतात. कधी अनपेक्षित आशा ही व्यक्तिरेखा त्यांच्या क थेत येतात. उदा. पुरूषौतम, अर्ध्यामुर्ध्या मधील स्त्रीया पुतळे इत्यादि वेगवेगळया व्यवसायातील माणसे त्यांच्या कथेत येतात. कधी भि कारी (कस्तुरीमृग) तर कधी पोलीस

(सुटकेसवाला महाबळ) तर कधी सेठ सावकारांची व्यक्तिरेखा येते. मुंबईत जाणाऱ्या मध्यम वर्गीय व्यक्तिरेखा सुद्धा येतात. तसेच ग्रामीण भागातले किर्तनकार आणि पाश्चात्य देशातले बॉब, डेलेरेस असे ही येतात त्यामुळे त्यांच्या कथेचे अनुभव व्यापक होते.

त्यांच्या कथेतील अनुभव हे केवळ मराठी नाहीत आणि जगातील अनुभव असले तरी ते मराठी माणसाची कक्षा सोडून नाहीत. म्हणूनच त्याची कथा मराठी भाषेशी नाते सांगणारी आहे. तसेच विश्वव्यापक अनुभव सांगणारी ही आहे. म्हणूनच मराठी बरोबर पाश्चिमात्य भाषात मराठी अगोदर त्यांच्या कथा प्रसिद्ध आहेत. कथेतील अनुभव हा विश्व व्यापक हा स्थल काळातील असल्याने त्यांची कथा अनेक अर्थ वलय निर्माण करते. अर्थाच्या शक्यतेची व्यमिश्र जाळे निर्माण करते. रूढ मराठी नवकथेतल्या अनुभवाच्या, अभिव्यक्तिच्या आणि घटनापात्र प्रसंगाच्या मर्यादीत कक्षेच्या पलीकडे जाणाऱ्या सारंग यांच्या कथा आहेत. सारंग यांची कथा अस्तित्ववादी असली तरी मराठीतील कोणत्याही अस्तित्ववादी साहित्याचा प्रवाहात ती बसत नाही. त्यांची कथा अनुकरणापासून आली आहे असे ही वाट नाही किंवा त्यांच्या कथेनंतर मराठीत त्यांच्या पद्धतीची कथा निर्माण झाल्याचेही दिसत नाही. त्यामुळे सारंग यांचे कथा विश्व स्वतंत्र आहे. मराठी नवकथेच्या दुसऱ्या पिढीत आपली एक वेगळी शैली, प्रतिमा, स्थान निश्चित केले आहे हे निश्चित.

# प्रकरण - पाचवे

## संदर्भ सूची


१. म.द. हातकणंगलेकर - मराठी कथा रूप आणि परिसर, पुणे, सुवर्णप्रकाशन, आवृती दुसरी १९९८ पृष्ठ २१

२. म.द. हातकणंगलेकर - तत्रैव पृष्ठ ४१

३. अंजली सोमण - मराठी कथेची स्थितीगती, पुणे, प्रतिमा प्रकाशन आवृती पहिली १९९५ पृष्ठ - ९७

४. अंजली सोमण - तत्रैव पृष्ठ - १७९

५. सुकन्या अगाशे - सत्यकथा, आक्टोबर दिवाळी १९७९.

६. वसंत आबाजी डहाके - समकालीन साहित्य,य.च.म. मुक्त विदयापीठ अभ्यासक्रम-बी.ए. भाग-२ पृष्ठ

७. म.द. हातकंणगलेकर - मराठी साहित्य प्रेरणा स्वरूप (१९५० ते १९७५) संपा. गो. मा. पवार / म.द. हातकणंगलेकर , पुणे, पॉप्युलर प्रकाशन, आ. प. १९८६ पृष्ठ १७४

८. सुधा जोशी - कथा : संकल्पना आणि समीक्षा, मुंबई. मौज प्रकाशन आ.प. २००० पृष्ठ १७६९.

९. सुधा जोशी - सत्यकथा, जुलै १९७९ पृष्ठ क्र. ४६

१०. नरेश - चुळचुळमुंगी पळी पळी कंटाळा पृ. ८

११. नरेश - तत्रैव पृ. ३४

१२. नरेश - तत्रैव पृ. ४५

१३. म.द. हातकणंगलेकर - प्रदक्षिणा खंड दुसरा, पुणे, कॉन्टीनेन्टल प्रकाशन आ.दु. १९९८ पृ.

१४. अंजली सोमण - मराठी कथेची स्थिती गती, पुणे, प्रतिमा प्रकाशन आ.प. १९९५ पृ.१३५

१५. अंजली सोमण - तत्रैव पृष्ठ १३६

१६. वसंत पाटणकर - संवादिनी २००० मुंबई. संपा. दिगंबर पाध्ये प्रकाशक -कृष्णानाथ तरबे /केशव गोरे स्मारक ट्रस्ट

****